भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०८/२०१७

**१) सामाईक इरादा करून महिलेला घरात कैद करून काठीने हातापायावर मारून दुखापत केल्याने व इसमाला जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०६/०८/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील आरोपीतांनी सामाईक इरादा करून आरोपी क्र. १ पंढरी व फिर्यादी हे जुने पती पत्नी असुन फिर्यादी ही सध्या दुसऱ्या पती कडे राहत असतांनी यातील आरोपीतांनी फिर्यादीला तु दुसऱ्या घरून जुने पतीचे राहते गावी कुर्झा येथे आणुन घरामध्ये हाताला, पायाला लोंखडी बेडया ठोकुन कैद केले, व हाता बुक्यांनी, काठीने हातापायावर मारून दुखापत केल्याने तसेच नविन पतीला सुध्दा जिवे मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी सौ. सुचित्रा रविंद्र मेश्राम वय ४० वर्ष रा. अत्री हिचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३४१,३४२,३२३,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल हयगयीने चालवुन टिबल सिट बसवुन रोडवर पडुन महिलेचा मुत्यु होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०८/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील स्पलेन्डर मोटार सायकल क्र. ३६ डब्लु यु ५२५४ वर तिन सिट बसवुन हयगयीने, लापरवाहीने चालविल्याने त्याचे मोटार सायकल वर मागे बसलेली मृतक सौ. वर्षा सुभाष चांदेवार वय ३५ वर्ष रा. साखरा ही डांबरी रोडवर पडल्याने व गंभिर जखमी होवुन मरण पावल्याने चौकशी अहवाला वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१२८/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) अज्ञात वाहन चालकाचे निष्काळजीपने मोटार सायकलला धडक मारून एकाचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०८/२०१७ चे ११.३० वा. दर. यातील मृतक कुंदन शरद लांजेवार वय १८ वर्ष रा. मुंडीपार जिल्हा गोंदिया हा आपल्या मोटार सायकलने चान्नाबाकटी वरून सासरा येथे जात असतांनी यातील कोणीतरी आज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक मारून मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी माधवराव शिवराम पोहणकर वय ७० वर्ष रा. सासरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १३४ (अ),(ब),१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक ०७/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे जवाहरनगर, साकोली व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गु हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३८ लिटर हा.भ. दारू किंमती १९,००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०७/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०१, तीन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५३ केसेस करण्यात आलेल्या आहे.

सपोनी. पी. के. बोरकुटे
पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.९६५७४०७१७३

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.